क्र.पोमसं/४/१०/७/सार्वत्रिक बदल्या-१८(सपोनि)/०२/२०१८

पोलीस महासंचालक यांचे कार्यालय
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगत सिंह मार्ग,
कुलाबा, मुंबई-०१

दिनांक:-१२/०१/२०१८.

12 JAN 2018

**संदर्भ:-** १) सन-२०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दिनांक २५/०६/२०१४ व,
२) सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दिनांक ०६/०४/२०१५.

**विषय:-** निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१८ करीता माहिती पाठविणेबाबत.

-----०-----

**परिपत्रक:-**

उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या सन-२०१५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.११, दिनांक ०६/०४/२०१५ मधील मुख्य अधिनियमाचा [महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१] कलम-२२ न मधील पोटकलम (१) मधील (एक) (क) नुसार निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांचा सामान्य पदावधी हा पोलीस ठाणे किंवा शाखा येथे ०२ वर्षे, एखाद्या जिल्ह्यात ०४ वर्षे आणि परिक्षेत्रात ०८ वर्षे इतका असेल. तथापि जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखा व विशेष शाखा आणि आयुक्तालयातील गुन्हे शाखा व विशेष शाखा यांच्याकरीता सामान्य पदावधी हा ०३ वर्षे निश्चित करण्यात आलेला आहे.

२. वरील नमूद महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम-२२ न मधील पोटकलम (१) (एक) (१) (ड) नुसार निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांचा सामान्य पदावधी हा इतर आयुक्तालयात ०६ वर्षे, आणि मुंबई आयुक्तालयात ०८ वर्षे इतका निश्चित करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे (इ) नुसार विशेषीकृत अभिकरणामधील निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांचा सामान्य पदावधी हा ०३ वर्षे इतका निश्चित करण्यात आलेला आहे.

३. **सर्वसाधारण बदल्या-२०१८ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात.**

**अ) विहीत कालावधी पूर्ण झालेले निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक.**

**ब) विहीत कालावधी पूर्ण नाही, परंतु, मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज.**

**क) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक.**

**अ) विहीत कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी.**

i. दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी सध्या कार्यरत असलेल्या घटकांमध्ये विविध पदांवर (पोलीस उपनिरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक) सलगपणे म्हणजे परिक्षेत्रात ०८ वर्षे, मुंबई आयुक्तालयात ०८ वर्षे व मुंबई व्यतिरीक्त इतर आयुक्तालयात ०६ वर्षे अशी सेवा / कर्तव्य बजावले आहे, असे बदलीपात्र निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक.

ii. ज्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी विशेषीकृत अभिकरण म्हणजेच गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग (महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी व विशेष सुरक्षा विभाग यांच्यासह), नागरी हक्क संरक्षण विभाग, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, दहशतवाद विरोधी पथक, महामार्ग पोलीस व प्रशिक्षण संचालनालय (पोलीस प्रशिक्षण केंद्र/महाराष्ट्र पोलीस अकादमी / गुन्हे प्रकटीकरण केंद्र व अपारंपारिक अभियान व प्रशिक्षण केंद्र, नागपूर यांच्यासह) येथील विविध पदावर (पोउपनि / सपोनि) ०३ वर्षांचा सलग कालावधी पूर्ण झालेला आहे, असे बदलीपात्र निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक.

iii. दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांचा फोर्स वन / युसीटीसी फोर्स वन / नक्षलवाद विरोधी अभियान, नागपूर / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, म.रा., मुंबई / पोलीस महासंचालक कार्यालय यांचा महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधील कलम-२२ न (१) (एक) (१) (इ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध पदांवर (पोउपनि / सपोनि) ०२ वर्षांचा सलग कालावधी पूर्ण झालेले निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक.

iv. ज्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत किंवा त्यापूर्वी ते ज्या जिल्ह्यात कार्यरत आहेत, त्या जिल्ह्यात विविध पदावर (पोउपनि / सपोनि) ०४ वर्षांचा सलग कालावधी पूर्ण केलेला असेल, परंतु परिक्षेत्रात त्यांनी ०८ वर्षे इतका सलग कालावधी पूर्ण केलेला नाही, अशा निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या परिक्षेत्रीय आस्थापना मंडळाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडील सर्वसाधारण बदल्या-२०१८ चे आदेश निर्गमीत झाल्यानंतर बदल्या कराव्यात आणि त्याचा अनुपालन अहवाल ह्या कार्यालयास पाठवावा.

**ब) विहीत कालावधी पूर्ण नाही, परंतु, मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज.**

i. ज्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी त्यांच्या सध्याच्या पदावर विहीत कालावधी पूर्ण केलेला नाही. परंतु, त्या पदावरुन व ठिकाणावरुन इतर ठिकाणी बदली हवी असेल, अशा निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची त्यांच्या विनंतीच्या ठिकाणासह व अशी बदली का पाहिजे याच्या सबळ कारणांसह त्वरेने माहिती पाठवावी.

ii. दिनांक ०१/०२/२०१८ पूर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज / प्रतिकूल अहवाल इत्यादी या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येत आहेत. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**क) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक.**

i. ज्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/१४-अ / ६७ / एम्एम् / १८७ / २०१६, दिनांक ०७/१०/२०१६ व क्र.पोमसं/१४-अ/६७/एमएन/३२८/२०१६, दिनांक ०८/११/२०१७ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन त्यानुसार संबधीत निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदलीबाबत परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

४.    सर्वसाधारण बदल्या-२०१८ करीता खालीलप्रमाणे आराखडा निश्चित करण्यात आला आहे, त्याचे अनुपालन सर्वांनी करावे.

| **कालावधी** | **करावयाची कार्यवाही** |
|---|---|
| दिनांक १५/०१/२०१८ ते १५/०२/२०१८ | पोलीस घटकांनी निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांचे विनंती अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. तसेच, विहीत कालावधी पूर्ण झालेल्या बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांची माहिती तयार करावी. |
| दिनांक १६/०२/२०१८ | सर्व माहिती पोलीस महासंचालक कार्यालयात पाठविणे. |
| दिनांक १७/०२/२०१८ ते ३०/०३/२०१८ | पोलीस महासंचालक कार्यालयात बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंती अर्जाची तपासणी व कार्यवाही. |
| दिनांक ०१/०४/२०१८ ते १५/०४/२०१८ | पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ ची बैठक व आदेश |
| दिनांक १५/०४/२०१८ ते ३०/०४/२०१८ | बदली झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रितसर कार्यभार हस्तांतर करुन त्यांना कार्यमुक्त करणे |
| दिनांक ०१/०५/२०१८ ते १५/०५/२०१८ | सर्व निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी कर्तव्यावर हजर होणे व संबंधीत घटकांनी या कार्यालयास अनुपालन अहवाल पाठविणे. |
| दिनांक ३१/०५/२०१८ | कर्तव्यावर हजर न झालेल्या अधिकाऱ्यांना ज्ञापन देऊन हजर न झाल्यास त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासंबंधी कळविणे.<br>दिनांक ३१/०५/२०१८ नंतर मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून स्थगिती आदेशाव्यतिरीक्त इतर सर्व निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना स्थित कार्यमुक्त करुन दिनांक ०१/०६/२०१८ नंतर त्यांचे वेतन घटकात काढण्यात येऊ नये. |

५.    बदलीबाबत विनंती करण्यासाठी कोणीही निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यास येणार नाही. बदली झाल्यानंतर जोपर्यंत बदलीचे ठिकाणी हजर होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या कोणत्याही विनंतीचा विचार करण्यात येणार नाही. बदली झालेल्या निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांनी बदलीच्या ठिकाणी हजर होऊनच विनंतीसाठी नवीन घटकप्रमुखांचे मार्फतीने व त्यांचे अभिप्रायांसह अर्ज सादर करावा. नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने सादर न केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. बदली पुनर्विलोकनाबाबत नंतर कळविण्यात येईल.

६.    महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधील कलम-२ (६A) नुसार निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या या दरवर्षी एप्रिल महिन्यात करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशाप्रकारे वर नमूद केल्याप्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांच्याकडून त्या कालावधीत करणे सुलभ होण्याच्या दृष्टीकानोतून, सर्व संबंधीत पोलीस घटकप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे १) विहीत कालावधी पूर्ण झालेले निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षक, २) मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज तसेच, ३) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाच्या निःशस्त्र सहायक